# कृषि उत्पन्न बाजार समिती, पारनेर

**उपबाजार आवार: भाळवणी टा.ढोकेश्वर, सुपा**

## वार्षिक अहवाल

**सन २०२४-२५**

कृषि उत्पन्न बाजार समिती, पारनेर

कृषि विपणन- ज्ञान समन्वय- विकास

*** प्रसिध्द कांदा मार्केट ***

Scanned with CamScanner

## कृषि उत्पन्न बाजार समिती, पारनेर

# भावपूर्ण

# श्रध्दांजली

अहवाल सालात दिवंगत झालेले नागरिक व पहलगाम दहशतवादी हल्यात मृत्युमुखी पडलेले निष्पाप नागरीक व तदनंतर ऑपरेशन सिंदुरचे युध्दात वीरमरण प्राप्त झालेले सैनिक व बंधु-भगिनी, देशभक्त थोर नेते, कार्यकर्ते, संशोधक, तंत्रज्ञ, लेखक, साहित्यिक, जवान, संस्थेचे सभासद,सभासदांचे नातेवाईक, सल्लागार, ठेवीदार, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी बांधव, व्यापारी, हमाल, वाहन चालक मालक, हितचिंतक जे कोणी दिवंगत झाले आहे. त्यांच्या पवित्र स्मृतीस

अभिवादन

करून त्यांना कृतज्ञतापूर्वक

श्रध्दांजली

अर्पण करीत आहोत.

Scanned with CamScanner

# कृषि उत्पन्न बाजार समिती,पारनेर
# ता.पारनेर जि.अहिल्यानगर

Email :am_parner@msamb.com


जावक क्र.१३५/२०२५/२०२६ दिनांक:- ०१/०९/२०२५

## वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस

प्रति,
मा.श्री.सरपंच/चेअरमन/व्यापारी
ता.पारनेर जि.अहिल्यानगर.

कृषि उत्पन्न बाजार समिती,पारनेर ता.पारनेर या संस्थेची २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि.१९/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मुख्य बाजार आवार,पारनेर येथे मा.श्री.किसनराव सबाजी रासकर सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती पारनेर यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार विनिमय करणेसाठी आयोजीत केलेली आहे. तरी सदर सभेस आपण स्वत: अगर आपले प्रतिनिधींनी उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

### -: सभेपुढील विषय :-

विषय नं.१. मागील दि.२२/०९/२०२४ रोजीच्या सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
विषय नं.२. सन २०२३-२०२४ चे लेखापरिक्षण अहवालाची वाचुन नोंद घेणे
विषय नं.३. सन २०२४-२०२५ सालातील आर्थिक पत्रके वाचुन कायम करणे.
विषय नं.४. सन २०२४-२०२५ चे वार्षिक प्रशासकीय अहवाल वाचुन कायम करणे.
विषय नं.५. मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.
दि.०१/०९/२०२५

सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती,पारनेर
(मा.संचालक मंडळाचे आदेशाने)

टिप :- १) गणपुर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास तीच सभा त्याच तारखेस व त्याच ठिकाणी एक तासाने सुरु करणेत येईल. त्या सभेस गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही. २) सभासदांना कोणत्याही प्रकारची माहिती प्रश्न सुचना मांडावयाच्या असल्यास सभेपूर्वी ४ दिवस आगोदर म्हणजेच दिनांक १५/९/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यालयात आणुन द्याव्यात. ऐनवेळी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देणे व्यवस्थापक कमिटीवर बंधनकारक राहणार नाही. मुदतीत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे संबंधीतांना ३ महिन्याचे आत लेखी कळविण्यात येईल. ३)संस्थेने आर्थिक पत्रके व वार्षिक अहवाल संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत आलेली आहेत. ४) आपणास जर सभेस उपस्थित रहाणे शक्य नसेल तर प्रतिनिधीस स्वत:ची संमती देऊन पाठविण्यात यावे व प्रतिनिधींनी सभेच्या वेळेस संमती पत्र सादर करावे.

Scanned with CamScanner

# कृषि उत्पन्न बाजार समिती, पारनेर

## विद्यमान संचालक मंडळ

| अ.नं | संचालकाचे नाव | पद | गाव |
|---|---|---|---|
| १ | श्री.किसनराव सबाजीराव रासकर | सभापती | जवळा |
| २ | श्री.किसन पंढरीनाथ सुपेकर | उपसभापती | पठारवाडी |
| ३ | श्री.प्रशांत सबाजीराव गायकवाड | संचालक | हत्तलखिंडी |
| ४ | श्री.रामदास हनुमंत भोसले | संचालक | करंदी |
| ५ | श्री.आबासाहेब भाऊसाहेब खोडदे | संचालक | गांजीभोयरे |
| ६ | श्री.बाबासाहेब भिमाजी तरटे | संचालक | भाळवणी |
| ७ | श्री.संदिप लक्ष्मण सालके | संचालक | जवळा |
| ८ | श्री.अशोकराव साहेबराव सावंत | संचालक | पिंपळनेर |
| ९ | सौ.पद्मजा श्रीकांत पठारे | संचालिका | पारनेर |
| १० | सौ.मेघा श्रीरंग रोकडे | संचालिका | खडकवाडी |
| ११ | श्री.गंगाराम तुकाराम बेलकर | संचालक | पारनेर |
| १२ | श्री.बाबासाहेब वामनराव नऱ्हे | संचालक | ढोकी |
| १३ | श्री.विजय विनायक पवार | संचालक | सुपा |
| १४ | श्री.शंकर ताराचंद नगरे | संचालक | पारनेर |
| १५ | श्री.भाऊसाहेब सखाराम शिर्के | संचालक | कर्जुले हर्या |
| १६ | श्री.चंदन रमेश भळगट | संचालक | पारनेर |
| १७ | श्री.अशोकलाल माधवलाल कटारिया | संचालक | टाकळी ढोकेश्वर |
| १८ | श्री.तुकाराम दत्तु चव्हाण | संचालक | पारनेर |
| १९ | श्री.विकास एस. जाधव | सहा.निबंधक.सह संस्था | पारनेर |
| २० | श्री.सुरेश किसन आढाव | सचिव | पारनेर |

Scanned with CamScanner

# कृषि उत्पन्न बाजार समिती,पारनेर

## विद्यमान कर्मचारी वृंद

| अ.नं | कर्मचाऱ्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | श्री.आढाव.एस.के | सचिव |
| २ | श्री.येवले.के.व्हि | सहा.सचिव |
| ३ | श्री.शिंदे.व्हि.बी | लेखापाल |
| ४ | श्री.चेडे.आर.बी | निरीक्षक |
| ५ | श्री.औटी.एस.डी | रोखपाल |
| ६ | श्री.भगत.बी.बी | सांख्यिकी |
| ७ | श्री.नरसाळे.एस.एस | ग्रेडर |

Scanned with CamScanner

# कृषि उत्पन्न बाजार समिती,पारनेर
# वार्षिक अहवाल-२०२४-२०२५

## उपस्थित मान्यवर---

## निवेदन :-

सन्माननीय शेतकरी, सभासद, व्यापारी, हमाल, मापाडी व कामगार बंधुनो, देशभरात निर्यातक्षम कांदा या शेतमालाच्या खरेदी विक्री व्यवहारांसाठी प्रसिध्द असलेल्या कृषि उत्पन्न बाजार समिती,पारनेरच्या सन २०२४-२५ या कालावधीचा वार्षिक अहवाल यामध्ये बाजार समितीमध्ये प्रामुख्याने कांदा हा शेतमाल विक्रीसाठी येणारे शेतकरी बांधव, शेतमाल घेवुन येणारे वाहन चालक मालक, तसेच बाजार आवारातील व्यापारी बांधव, हमाल मापाडी यांचे मोलाचे योगदानाने व समन्वयाने बाजार समितीचे संचालक मंडळ व कर्मचारी वृंद यांनी बाजार समितीचे उत्पन्न वाढीसाठी केलेले प्रयत्न व खर्चातील काटकसर यामुळे आत्ता पर्यंत सर्वात जास्त उत्पन्न वाढीचा वार्षिक अहवाल व हिशोब पत्रके सादर करतांना मला अत्यंत आनंद होत आहे.

## प्रास्ताविक:-

आपला भारत देश प्रामुख्याने कृषि प्रधान देश आहे म्हणून शेतीला अन्यन्य साधारण महत्व असुन शेतीचे उत्पन्नावर देशाची प्रगती अवलंबुन आहे.या देशातील जवळ जवळ ७०% लोक शेती व्यवसाय करतात. त्यामुळे शेती व्यवसाय हा भारतीयांचा जिवनमार्ग व जिवणधारणा आहे. तर कृषि उत्पादन हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळेच म्हणतात "शेतकरी सुखी तर देशी सुखी"

त्यातली त्यात आपला पारनेर तालुका हा नैसर्गिक पर्जन्यछायेच्या प्रदेशात येत असल्याने, दुष्काळ व लहरी हवामान कायम शेतकऱ्यांचे पाचवीला पुजलेले आहे. परंतु पारनेर तालुक्यातील शेतकरी हा प्रचंड कष्टकरी व येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीस तोंड देवुन पावसाच्या पाण्यावर प्रचंड कष्ट करुन आपला शेतमाल पिकवितो.त्यामध्ये कांदा हा शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्नाचे महत्वाचे साधन बनलेला आहे. कांदा पिकाचे उत्पादनाबाबत पारनेर तालुक्याचे देशात नव्हे तर जगात नाव झालेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे शेतमालाला चांगली बाजारपेठ मिळावी. त्यांचे शेतमालाचे आल्या बरोबर वजन व्हावे, विक्रीत व वजनात फसगत होवु नये, निरनिराळया कपाती पासुन संरक्षण व्हावे, शेतकऱ्यांचे शेतमालाची जाहीर लिलाव पध्दतीने विक्री करुन त्यांना शेतमालाचे हिशोब पट्टीची रक्कम खात्रीशीर मिळावी व या सर्व व्यवहारांवर नियंत्रण असावे या उद्देशाने सरकारने १९३९ साली मुंबई प्रांता करीता स्वतंत्र कृषि उत्पन्न बाजार समिती कायदा अस्तित्वात आला व त्यात सुधारणा होवुन महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री ( विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चा कायदा अमलात येवुन त्या अन्वये २१ नोव्हेंबर १९८१ साली अहमदनगर बाजार समिती मधुन विभाजन होवुन कृषि उत्पन्न बाजार समिती पारनेरची स्थापना

Scanned with CamScanner

करण्यात आली व बाजार समितीच्या कामकाजास सुरुवात झाली. सुरुवातीच्या काळात अतिशय नगन्य व कायमच 'ड' वर्गात असणारी बाजार समितीचा खऱ्या अर्थाने सन २००० साली मुख्य बाजार आवार पारनेर येथे कांदा खरेदी विक्रीचे व्यवहार सुरु करुण कायापालट होण्यास सुरुवात झाली. त्यामुळे त्या काळचे संचालक मंडळ,सचिव व सर्वात महत्वाचे व्यापारी दिवंगत पाडुंशेठ काळे व सध्याचे व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष श्री.मारुतीशेठ रेपाळे तसेच ज्यांनी सुरवातीच्या काळात कांदा शेतमाल खरेदी विक्रीचे व्यवहार सुरु करणारे व्यापारी यांचे योगदान आहे. तसेच तालुक्यातील सर्वपक्षीय राजकीय नेतृत्व व बाजार समितीच्या जडण घडणी मध्ये योगदान देणारे सभापती,उपसभापती, संचालक मंडळ, यांनी राजकीय जोडे बाहेर ठेवुन संस्थेच्या भरभराटीसाठी नेहमी प्रयत्न मार्गदर्शन केलेले आहे. तसेच पारनेर तालुक्या बरोबरच शिरुर, श्रीगोंदा,संगमनेर, जुन्नर, नगर तालुक्यातील शेतकरी बांधवांनीही बाजार समितीवर विश्वास दाखविलेला आहे. त्याचे ही मनापासुन अभिनंदन करतो.

## कार्यक्षेत्र :-

बाजार समितीचे कार्यक्षेत्र संपुर्ण तालुक्याचे असुन त्यामध्ये १३१ गावे त्याखालील वाडया वस्त्यांचा समावेश आहे.

शेतमाल नियमन :- गहु, ज्वारी, बाजरी, हरभरा, मका, सोयाबीन, मुग, तुर, तीळ, उडीद, मिरची, कापुस, सरकी, गुळ, भुईमुग, करडी, जवस, धने, कांदा, बटाटा, लसुन, लिंबु, पालेभाज्या, चवळी, घेवडा, आले, केळी, मोसंबी, कलिंगड, द्राक्ष, टरबुज, चिंच, बोरे, पपई, गवत, वैरण, कोंबडया, अंडी, लोकर, ताग, कडधान्य, भात इत्यादी शेतमालाचे नियमन केलेले आहे.

## मुख्य बाजार आवार पारनेर :-

बाजार समितीचे मुख्य बाजार आवार पारनेर येथे बाजार समितीचे गट नं.४१२४/१ व ४१२४/२ मध्ये ४ एकर १५ गुंठे क्षेत्र आहे.त्यामध्ये बाजार समितीने शेतमाल खरेदी विक्रीचे अनुषंगाने खालील सुविधा निर्माण केलेल्या आहेत.

१) राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत सेलहॉल.
२) १००० मे.टन क्षेमतेचे गोदाम
३) शेतमाल विक्री साठी लिलाव शेड
४) २९ व्यापारी गाळे
५) पिण्याच्या पाण्यासाठी आर.ओ वॉटर फिल्टर
६) सुसज्य कार्यालय इमारत व सभागृह
७) ६० टनी भुईकाटा
८) संपुर्ण बाजार आवाराला वायफाय सुविधा
९) संपुर्ण बाजार आवाराला सी.सी. टिव्ही यंत्रणा

Scanned with CamScanner

१०) सुपा-पारनेर रोड ते बाजार समिती पर्यंत मा.खा.डॉ.श्री.निलेशजी लंके साहेब यांचे माध्यमातुन सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत कॉंक्रेटीकरण रोडचे रु.७५ लक्ष निधीतुन काम पुर्ण झालेले असुन त्या माध्यमातुन अनेक दिवसांचा रस्त्याचा प्रश्न कायम स्वरुपी मार्गी लागलेला आहे.

## उपबाजार भाळवणी :-

१) उपबाजार भाळवणी येथे गट नं.५७२/२ मध्ये बाजार समितीची ०.८० आर जागा असुन त्याठिकाणी बाजार समितीने २३ व्यापारी गाळेचे बांधकाम केलेले आहे. परंतु व्यापारी यांचे अनास्थेमुळे ते गाळे बंद होते सदर ठिकाणी बाजार समितीने नविन व्यापारी यांना अनुज्ञप्ती देवुन शेतमाल खरेदी विक्री व्यवहार सुरु केलेला आहे. त्याकरीता सदर जागेचा पुढील ५ वर्षाचा विचार करुण विकास आराखडा (ले आऊट) तयार करुन तो मंजुरीसाठी मा.पणन संचालक साहेब महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडे पाठवुन त्यास मा.पणन संचालक साहेब यांची मंजुरी घेण्यात आलेली आहे. त्यानुसार तेथे भाजीपाला खरेदी विक्रीचे व्यवहार दैनंदिन सुरु करणेत आलेले आहेत. तसेच व्यापारी गाळ्यांसमोर ओपन शेड प्रस्तावीत आहे. पुढील काळात शासनाचे DMI योजनेतुन विविध विकास कामे करुण बाजार आवार विकसीत करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

## पेट्रोलपंप :-

बाजार समितीने उपबाजार भाळवणी येथील जागेमध्ये सन २००८/२००९ या आर्थिक वर्षात दि.१९/३/२००९ रोजी इंडियन ऑयल कॉर्पोरेशन लि. या कंपनीचा पेट्रोलपंप सुरु केलेला असुन त्याठिकाणी भाळवणी परिसरातील अनेक शेतकरी, वाहन मालक,ट्रक,टेम्पो चालक ,भाळवणी व आसपासच्या परीसरातील नागरीक संस्थेचा पेट्रोलपंप असल्याने पेट्रोल व डिझेल खरेदी साठी येत असतात. सदर पंपासाठी सुरुवातीला घेतलेले कर्जाची वेळेवर परतफेड करुन सध्या गेल्या अनेक वर्षापासुन पंप भांडवलावर चालु आहे. बाजार समितीने त्याठिकाणी सोलर सिस्टीम बसविण्यात आलेली असुन त्यामाध्यमातुन मोठया प्रमाणात विज बिलाची बचत झालेली आहे. अहवाल वर्षात बाजार समितीने एकुण ४ लाख ६२ हजार लिटर पेट्रोल, ४४ हजार ५५० लिटर पॉवर पेट्रोल, ५ लाख ८२ हजार लिटर डिझेलची विक्री केलेली असुन त्या माध्यामातुन बाजार समितीची रु.१० कोटी ९३ लाख इतकी आर्थिक उलाढाल होवुन ३२ लाख ७० हजार इतका व्यापारी नफा झालेला आहे. तसेच तेथे दैनंदिन भाजीपाला खरेदी विक्रीचे व्यवहारांतुन रु.१ लाख १९ हजार उत्पन्न झालेले आहे.

## उपबाजार सुपा :-

सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये प्लॉट नं.सी-२१ मध्ये बाजार समितीची ६३ आर जागा असुन त्याठिकाणी बाजार समितीने राष्ट्रीय कृषि विकास योजने मधुन महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांचे माध्यमातुन १००० मे.टन क्षमतेचे गोदाम व धान्यचाळणी यंत्राचे काम पुर्ण झालेले आहे. धान्य चाळणी यंत्र कार्यान्वीत करुन शेतकऱ्यांना त्यांचे कडधान्याची चाळणी (ग्रेडींग) करुन देण्यात येणार

Scanned with CamScanner

आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाची प्रतवारी नुसार बाजार भाव मिळण्यास मदत होणार आहे. तसेच १००० मे.टन गोदाम व धान्य चाळणी यंत्र भाडेतत्वावर देण्यात येवुन समितीचे उत्पन्नात वाढ करणेचा प्रयत्न करणार आहोत. तसेच तेथील जागेचा विकास आराखडा तयार करुन त्या प्रमाणे नियोजीत विकास कामे करण्याचा प्रयत्न आहे.

## उपबाजार टाकळी ढोकेश्वर :-

उपबाजार टाकळी ढोकेश्वर येथे गट नं.१६४ मध्ये बाजार समितीची २ एकर ३० गुंठे जागा असुन सध्या ती विना वापर पडुन आहे.

## बाजार समिती मुदतठेव :-

पारनेर बाजार समितीने आपल्या दैनंदिन खर्चात काटकसर करुन उत्पन्न वाढीवर भर दिला आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात रु.१ कोटी ३ लाखची मुदत ठेव व २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात मोठ्या प्रमाणात नफा होवुन रु. २ कोटी ९ लाखची मुदत ठेव तसेच दि.१ एप्रील २०२५ नंतर रु.५० लाखची मुदत ठेव केलेली असुन आत्तापर्यंत नवीन संचालक मंडळ आल्यापासुन बाजार समितीने आजपर्यंत एकुण रु.३ कोटी ६२ लाखच्या मुदत ठेवी केलेल्या आहे. त्यामुळे बाजार समितीच्या अ.नगर जिल्हा मध्यवर्ती सह बँक शाखा.पारनेर शहर येथे २ कोटी १२ लाख व स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा पारनेर येथे १ कोटी ५० लाख असे एकुण ३ कोटी ६२ लाख मुदत ठेवी केलेल्या आहेत. मुदत ठेवीच्या मिळणाऱ्या व्याजाच्या माध्यमातुन बाजार समितीच्या उत्पन्नात वार्षिक २१ ते २२ लाख वाढ होणार आहे.

## कर्मचारी भविष्य निर्वाह निधी :-

बाजार समितीने कायम कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीची स्वतंत्र बँक खात्यात गुंतवणुक केलेली आहे. कायम कर्मचारी यांचा जमा असणारा भविष्य निर्वाह निधीची रक्कमेच्या रु.८७ लाख चे मुदत ठेवी असुन त्यापासुन ६ लाख ३२ हजार व्याज मिळालेले आहे. त्याची प्रत्येक कर्मचाऱ्याची स्वतंत्र मुदत ठेव पावती जिल्हा मध्यवर्ती बँकेत केलेली आहे. त्यामुळे संस्थेला कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमेवर द्यावे लागणाऱ्या व्याजाच्या रक्कमेवर खर्च करावा लागत नाही. तसेच संस्थेने सन २०२१ पासुन कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन नाशिक (EPFO) येथे कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची गुंतवणुक केलेली आहे. तसेच कर्मचारी ग्रॅज्युटीची रक्कम एल.आय.सी.ऑफ इंडिया यांचे कडे गुंतवणुक केलेली असुन त्याचे सर्व हप्त्यांची रक्कमेचा भरणा वेळचे वेळी करण्यात आलेला आहे. त्यामुळे संस्थेचे सेवा निवृत्त झालेल्या कर्मचारी यांची सर्व देणी तात्काळ त्यांना नियमानुसार अदा करणेत आलेली आहेत. तसेच समितीचा आस्थापना खर्चाची मर्यादा ५० टक्के असतानाही फक्त १६ टक्के आस्थापना खर्च झालेला आहे.

Scanned with CamScanner

## प्रस्तावणा:-

कृषि उत्पन्न बाजार समिती, पारनेर ची आज दि.१९/०९/२०२५ रोजी वार्षीक सर्वसाधारण सभा संपन्न होत आहे.

कृषि उत्पन्न बाजार समिती पारनेरची दि.२९/४/२०२३ रोजी निवडणुक संपन्न झाली. निवडुन आलेल्या संचालक मंडळ सुरवातीला श्री.बाबासाहेब भिमाजी तरटे यांनी सभापती म्हणुन व श्री. भाऊसाहेब सखाराम शिर्के यांची उपसभापती म्हणुन निवड झालेली असुन त्यांनी त्यांचा ठरलेला कार्यकाळ संपलेने त्यांचे पदाचा राजीनामा देवुन त्यांचे जागी दि.३/३/२०२५ रोजी सभापती म्हणुन श्री.किसनराव सबाजी रासकर व उपसभापती म्हणुन श्री.किसनराव पंढरीनाथ सुपेकर यांची निवड होवुन ते कामकाज पाहत आहेत.

## मागील ३ वर्षाचा उत्पन्न खर्च व वाढावा (नफा) चा तक्ता:-

| वर्ष | उत्पन्न | खर्च | वाढावा |
|---|---|---|---|
| २०२२-२०२३ | १,७७,०९,११६.६५ | १,४९,१४,४१३.६१ | २७,९४,७०३.०४ |
| २०२३-२०२४ | ३,१९,३०,४२१.४३ | १,८६,३८,४३२.२५ | १,३२,९१,९८९.१८ |
| २०२४-२०२५ | ४,४१,३८,५५७.८० | २,२४,२९,०३७.५४ | २,१७,०९,५२०.२६ |

## चालु असलेली व पुर्ण झालेली विकास कामे :-

१) मा.खा.श्री.निलेशजी लंके साहेब यांचे माध्यमातुन सुपा रोड ते बाजार समिती कॉंक्रेटीकरण रोड - ७५ लक्ष (काम पुर्ण)

२) जुन्या कार्यरत व्यापारी यांना नविन व्यापारी गाळे बांधकाम - ९४ लक्ष

३) संपुर्ण यार्डाला सी.सी.टिव्ही - ६ लाख १७ हजार (काम पुर्ण)

४) बाजार आवाराला वायफाय सुविधा - १ लाख ८६ हजार (काम पुर्ण)

५) मापाडी यांना तोलाई सॉप्टवेअरसाठी मोबाईल खरेदी - २ लाख ८५ हजार (काम पुर्ण)

६) वाटाणा व फुल व्यापारी यांना दोन गाळे - ३ लाख ८३ हजार (काम पुर्ण)

७) सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये नविन विद्युत ट्रान्सफार्मर - ३ लाख ५ हजार (काम पुर्ण)

८) मुख्य बाजार आवार पारनेर येथील विद्युत लाईन स्थलांतरण- ४ लाख २० हजार. (काम पुर्ण)

९) मुख्य बाजार आवार पारनेर येथे मुख्य रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसवणे- ४ लाख २० हजार.

१०)मुख्य बाजार आवार कमानीचे सुशोभीकरण करणे-५ लाख ६१ हजार.

Scanned with CamScanner

११)मुख्य बाजार आवार पारनेर येथे ३० किलो वॅट सोलर सिस्टीम-१३ लाख १९ हजार.

## प्रस्तावीत विविध विकास कामे :-

१) मुख्य बाजार आवार पारनेर येथे पीण्याचे पाणी टाकी.

२) मुख्य बाजार आवार पारनेर येथे येणारे शेतकरी यांना अल्पदरात भोजन व्यवस्था

३) मुख्य बाजार आवार पारनेर येथे नविन लिलाव शेड

४) नियोजीत व्यापारी गाळे यांचे दुसऱ्या मजल्यावर शेतकरी निवास व प्रशिक्षण केंद्र

५) उपबाजार भाळवणी येथे शेतमाल खरेदी विक्री दैनंदिन भाजीपाला खरेदी विक्री चालु केलेली असुन, वजनकाटा, शेडची उभारणी करणे.

६) उपबाजार भाळवणी येथे व्यापारी गाळ्यांसमोर लीलाव शेड.

७) सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये शितगृह कार्यान्वीत करणेसाठी प्रयत्न करणे.

८) सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये फेज-२ बाजार समितीचा पेट्रोलपंप

९) सुपा औद्योगीक वसाहती मध्ये फायर युनीट व जागेचा विकास आराखडा तयार करणे.

## समिती पदाधिकारी :-

कृषि उत्पन्न बाजार समिती, पारनेरची संचालक मंडळाची सन २०२३-२०२८ या कालावधीची पंचवार्षिक निवडणुक दि.२९/४/२०२३ रोजी झालेली असुन सदस्यांची पहिली सभा दि.१३/५/२०२३ रोजी होवुन त्यामध्ये श्री.बाबासाहेब भिमाजी तरटे सभापती व श्री.भाऊसाहेब (बापु) सखाराम शिर्के यांची उपसभापती म्हणुन निवड झालेली आहे. त्यांचा कार्यकाळ संपल्याने त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने त्यांचे जागी दि.३/३/२०२५ रोजी विद्यमान सभापती श्री.किसनराव सबाजीराव रासकर व उपसभापती श्री.किसन पंढरीनाथ सुपेकर यांची निवड झालेली आहे.

## बाजार समिती सभा :-

बाजार समितीच्या सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात ९ सभा झालेल्या असुन संचालकांची उपस्थिती बहुसंख्येने होती. तसेच सभांचे कामकाज भविष्यातील नियोजन पुर्वक विकास कामे, नियोजन, शिस्त व खेळीमेळीच्या वातावरणात एकमताने झालेले आहे.

Scanned with CamScanner

# कृषि उत्पन्न बाजार समिती, पारनेर
# ता.पारनेर जि.अहिल्यानगर

## -: ठळक वैशिष्टे :-

१) देशात नावाजलेली कांदा या शेतमालाचे खरेदी विक्री चे व्यवहार होणारी बाजार पेठ

२) कार्यक्षेत्रात उत्पादीत होणारा कांदा निर्यातक्षम असल्याने त्याला परदेशात प्रचंड मागणी

३) शेतमालाचे आवक झाल्या बरोबर वजन करणारी जिल्हयातील पहिली बाजार समिती

४) इलेक्ट्रॉनिक वजन काटयाच्या वापरामुळे चोख वजन माप व्यवस्था

५) शेतकऱ्यांना तातडीने पेमेंटची व्यवस्था

६) उपबाजार भाळवणी येथे इंडियन ऑयल कंपनीचा स्वमालकीचा पेट्रोल पंप.

७) उपबाजार भाळवणी येथे दैनंदिन भाजीपाल खरेदी विक्री विक्रीचे व्यवहार सुरु करणेत आलेले आहेत.

८) सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये धान्यचाळणी यंत्राचे माध्यामातुन शेतकऱ्यांचे कडधान्य चाळणीची व्यवस्था

९) शेतकरी व व्यापारी यांचेसाठी वजनमापे रिपअेरींग सेंटर

Scanned with CamScanner

## सन २०२४-२०२५ मध्ये झालेली शेतमाल आवक व बाजारभाव

| अ.नं | माहे | कांदा आवक क्विंटल | बाजारभाव | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | कमाल | किमान | सरासरी |
| १ | एप्रिल २०२४ | १५२८६२ | १८०० | ३०० | १२५० |
| २ | मे २०२४ | ११७६५३ | २७०० | ३०० | १४६० |
| ३ | जुन २०२४ | ८२९७६ | ३५०० | ७०० | २२२५ |
| ४ | जुलै २०२४ | ८८६१८ | ३५०० | १००० | २३०० |
| ५ | ऑगस्ट २०२४ | ९९३९५ | ४५०० | १००० | २८१० |
| ६ | सप्टेंबर २०२४ | ७४२८३ | ५३५० | १५०० | ३९१० |
| ७ | ऑक्टोबर २०२४ | ७८१४२ | ५२०० | १००० | ४०० |
| ८ | नोव्हेंबर २०२४ | ६८४८० | ७२०० | १५०० | ४२८० |
| ९ | डिसेंबर २०२४ | २६९९५९ | ५५०० | ५०० | २८२५ |
| १० | जानेवारी २०२५ | २२२०७० | ३८०० | ५०० | २१२५ |
| ११ | फेब्रुवारी २०२५ | १३१७१२ | ३५०० | ५०० | २११० |
| १२ | मार्च २०२५ | १४४१२७ | २८०० | ३०० | १५५० |
| | एकुण | १५३०२७७ | ७२०० | ५०० | २५७० |

## मागील ३ वर्षाचे आवकेचा तक्ता :-

| अ.नं | सन | कांदा आवक क्विंटल | बाजारभाव | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | कमाल | किमान | सरासरी |
| १ | २०२२-२०२३ | ११,९०,०३६ | ४१०० | २५० | ११३० |
| २ | २०२३-२०२४ | १७,१४,००७ | ६२०० | २२५ | १६०० |
| ३ | २०२४-२०२५ | १५,३०,२७७ | ७२०० | ५०० | २५७० |

सन २०२४-२०२५ या वर्षात १५ लाख ३० हजार क्विंटल कांदा या शेतमालाची आवक होवुन त्यांचे उलाढालीचे माध्यमातुन संस्थेस रु.४ कोटी ४१ लाख आज पर्यंत चे विक्रमी उत्पन्न झालेले असुन रु.२ कोटी १७ लाख नफा झालेला असुन बाजार समितीस राज्य शासनाचे अ** नामांकन मिळालेले आहे.

Scanned with CamScanner